नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक २२/०१/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

## पोलिस स्टेशन उमरेड मौजा ब्राम्हणी शिवारात अश्लिल डान्स आयोजित करणाऱ्या तीन आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले

पो.स्टे. उमरेड, मौजा ब्राम्हणी शिवारात दि. १७.०१.२०२२ रोजी दिवसा शंकरपटाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता व त्याच रात्री सांस्कृतीक कार्यक्रमाचे नावावर गावातील १) चंद्रशेखर उर्फ लाला प्रभुजी मांढरे, २) सुरज निळकंठ नागपुरे, ३) अनिल शालीग्राम दमके यांनी ॲलेक्स डांस शो नागपूर येथील कलाकारांना आंमत्रीत करून पोलीसांची किंवा कोणत्याही इतर विभांगाची परवांनगी न घेता व कुणालाही माहिती न देता स्त्रियांचे अश्लिल व बिभत्स डान्स चे आयोजन केले होते. आज रोजी पोस्टे उमरेड येथे माहिती प्राप्त होताच पोस्टे ला वरील लोकांचे विरूध्द तात्काळ अप क्र. ३३/२२ कलम २९४,१८८,३४ भांदवि सहकलम १३१(अ) ११०,११२,११७ महाराष्ट्र पोलीस कायदा तसेच ६७(अ) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील तिन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. गुन्हयात अधिक आरोपी निष्पन्न करून त्वरीत अटक करण्यात येत आहेत.

सदर कार्यक्रम आयोजीत करण्यामध्ये अजुन कोण—कोण जवाबदार आहेत या बाबत घटनेची स्वतंत्र चौकशी व गुन्ह्याचे तपासाकामी मा. श्री. विजयकुमार मगर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांची नेमणुक केली असुन त्यांना प्रकरणाची चौकशी लवकरात लवकर करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच गुन्ह्याचे तपासात मदतकामी दोन पथक देण्यात आलेले आहे. चौकशी अंती दोषींवर योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर